पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ४
<u>सभावृत्तांत</u>

दिनांक :- १८/०८/२०१० वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १८/८/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले - सभापती

२) मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब - उपसभापती

३) मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

४) मा. दत्तात्रय बाबुराव साने

याशिवाय मा. चाकणकर - उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

विषय क्रमांक :- २) सुपर मित्र मंडळ ,पिंपरी यांना सेवाशुल्क तत्वावर कराराने चालविण्यास दिलेली मनपाची पिंपरी कॅम्प व्यायामशाळा करार संपुष्टात आल्याने त्यांना मुदतवाढ देणेबाबत मा. अजित गव्हाणे मा. मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ३) All India Jr. Hockey Championship Mayors Cup For Boy’s & Girls स्पर्धा आयोजित करणेबाबत मा. अजित गव्हाणे मा. मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव..

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा. प्रभाकर वाघेरे अनुमोदक : मा. दत्तात्रय साने

गुरूवार दिनांक २६/८/२०१० रोजी दुपारी ४.०० पर्यत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

मा.सभापती : गुरूवार दिनांक २६/८/२०१० रोजी दुपारी ४.०० पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

[ राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ४
<u>सभावृत्तांत</u>
( दि. १८/८/२०१० ची तहकूब सभा)

दिनांक :- २६/०८/२०१० वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची दि. १८/८/२०१० ची तहकूब सभा गुरूवार दिनांक २६/८/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले - सभापती

२) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव

३) मा. दत्तात्रय बाबुराव साने

याशिवाय मा. चाकणकर - उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

मा.सभापती : सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने बुधवार दिनांक १/९/२०१० रोजी दुपारी ३.४५ पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

[ राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ४
सभावृत्तांत
( दि. १८/८/२०१० व २६/८/२०१० ची तहकूब सभा)

दिनांक :- १/०९/२०१० वेळ :- दुपारी ३.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची दि. २६/८/२०१० ची तहकूब सभा बुधवार दिनांक १/९/२०१० रोजी दुपारी ३.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले - सभापती

२) मा. तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब - उपसभापती

३) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव

४) मा. बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

५) मा. अजित दामोदर गव्हाणे

६) मा. ननावरे जितेंद्र बाबासाहेब

याशिवाय मा. गायकवाड - सहा. आयुक्त , मा. सहस्त्रभोजनी - प्र. उपनगरसचिव , मा. पानसरे - क्रीडा अधिकारी , हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ४/०८/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक :-१५ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १/०९/२०१० विभाग - क्रीडा
सुचक :- मा. प्रभाकर वाघेरे अनुमोदक :- मा. अजित गव्हाणे
संदर्भ :- मा. अति. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. क्रीडा/४/कावि/ ५१२/ २०१०, दि. ९/८/२०१०

मा. अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे ..

मनपा कडील कै. वसंतदादा पाटील प्रथमिक विद्यालय, आकुर्डी व्यायामशाळा, भोईराज प्रतिष्ठान, आकुर्डी पुणे-३५ यांना दरमहा सेवाशुल्क र.रू. २०००/- मनपाकडून

देऊन ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

## सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले

ठराव क्रमांक :-१६ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०१/०९/२०१०
सुचक :- मा.अजित गव्हाणे अनुमोदक :- मा. मच्छिंद्र तापकीर
संदर्भ :- मा. अजित गव्हाणे मा. मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव -

मनपाची पिंपरी कॅम्प व्यायामशाळा मा. अति. आयुक्त यांचेकडील आदेश क्र. क्रीडा/८/कावि/ १७४/२००९, दि. १/८/२००९ अन्वये दि. १/८/२००९ ते दि. ३०/६/२०१० अखेर ११ महिने कराराने सुपर मित्रमंडळ यांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिलेली असून सदर करारनाम्याची मुदत दि. ३०/६/२०१० रोजी संपुष्टात आली असल्याने पिंपरी कँप व्यायामशाळा पुन्हा सुपर मित्र मंडळ यांना दरमहा र.रू. २०००/- मनपाकडून देवून ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :-१७ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०१/०९/२०१०
सुचक :- मा.अजित गव्हाणे अनुमोदक :- मा.मच्छिंद्र तापकीर
संदर्भ :- मा. अजित गव्हाणे मा. मच्छिंद्र तापकीर यांचा प्रस्ताव -

इंडियन हॉकी फेडरेशन यांच्या मान्यतेने पिंपरी चिंचवड मनपा व पुणे जिल्हा हॉकी असो. यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० सप्टें. ते ३ ऑक्टो. २०१० याकाळात छत्रपती शिवाजी क्रीडा संकुल बालेवाडी येथे मुलांच्या व मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, नेहरूनगर येथे मुलींच्या, “All India Jr. Hockey Championship Mayors Cup For Boy’s & Girls” स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रू.

३७,००,०००/- चे खर्चास  अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[ राजेश ऊर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/९/कावि/ ११२४ /२०१०
दिनांक :-   ३/०९/२०१०

प्र.उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८